International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# बाबा आमटे यांच्या कार्याचे ऐतिहासिक सिंहावलोकन

**अरुण बी. आलेवार**
सहाय्यक प्राध्यापक तथा, इतिहास विभाग प्रमुख
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय कोंढा - कोसरा, ता. पवनी, जि. भंडारा
**Corresponding Author: अरुण बी. आलेवार**
**Email: -** arunalewar203@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14899970**

**सारांश:-**

बाबा आमटे हे आधुनिक भारतातील प्रख्यात समाजसुधारक, कवी, लेखक, स्वातंत्र्यसैनिक आणि विचारवंत म्हणून ओळखल्या गेले. महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि सामाजिक कार्यात सहभागी झाले. समाजात तिरस्कार असणाऱ्या कुष्ठरोग्यांना जवळ करून आनंदवनाच्या माध्यमातून त्यांचे जीवन फुलविले. बाबांनी आनंदवनाच्या माध्यमातून अनेक प्रकल्प सुरू केले. सामाजिक सेवेचे कार्य सुरू असताना बाबा आमटे यांनी भारत जोडो अभियान, नर्मदा बचाव आंदोलन यात सहभाग घेऊन आपले समाजाप्रती असलेले दायित्व दाखवून दिले. बाबांनी वरोड्यासारख्या भागात उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे समाजात परिवर्तन घडून आले. बाबा आमटे यांना कुष्ठरोग्यांच्या सेवेमुळे जागतिक कीर्ती प्राप्त झाली.

**बीजशब्द:-** सामाजिक कार्य, शैक्षणिक कार्य, इतर कार्य

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र ही संत महात्मे, सुधारक आणि विचारवंतांची पवित्र भूमी आहे अंधश्रद्धा रूढी परंपरेत आणि गुरफटलेल्या समाजाला रूढीपरंपरेच्या आणि जोखडातून बाहेर काढण्याचा प्रयत्न अनेक समाजसुधारकांनी केल्याचा गौरवशाली इतिहास महाराष्ट्राला लाभलेला आहे. १९ व्या शतकात भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणेचा पाया बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी घातला.या सुधारणा चळवळीची लाट महाराष्ट्रामध्ये पसरली.महात्मा ज्योतिराव फुले, गो. ग. आगरकर, पंडिता रमाबाई, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, रमाबाई रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, सावित्रीबाई फुले ,राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणेत मोलाची भूमिका पार पाडली. त्याचप्रमाणे विदर्भात संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी निस्वार्थ भावनेने समाज जागृती केली. अशा महान सुधारकांच्या नामावलीमध्ये बाबा आमटे यांचे नाव घ्यावे लागेल. बाबा आमटे यांनी श्रीमंतीचा मुखवटा दूर सारून महात्मा गांधीजी व विनोबा भावे यांच्या कार्याने प्रभावित होऊन समाज जागृतीच्या कार्याला सुरुवात केली. कुष्ठरोगी म्हटला तर त्याची जागा समाजात नव्हती. अशा कुष्ठरोगीना जवळ करून त्यांच्या जीवनात आनंदनाच्या माध्यमातून नंदनवन फुलविले. बाबा आमटे एवढ्यावरच थांबले नाही तर कुष्ठरोग्यांच्या सहकार्याने अनेक प्रयोग आनंदवनात केले. इवल्याच्या स्वरूपात लावलेल्या आनंदवन रोपट्याचं वटवृक्ष झाला आणि बाबा आमटे जगविख्यात झाले. सोमनाथ, हेमलकासा, नागपूर यासारख्या ठिकाणी प्रकल्प सुरू केले. हेमलकसा माडीया गोंड मागासलेल्या भागातील लोकांना प्रवाहात आणले. बाबा आमटे यांनी सामाजिक दायित्व जपत देशाच्या एकात्मतेकडे लक्ष देऊन भारत जोडो अभियानातून देशाभिमान भारतीयांमध्ये निर्माण केला. तसेच बाबा आमटे नर्मदा बचाव आंदोलनाशी जोडले होते. बाबा आमटे यांना आधुनिक भारताचे संत म्हटल्यास अतिशय होणार नाही. बाबा आमटे अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी होते हे त्यांच्या कार्यावरून स्पष्ट होते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून बाबा आमटे यांच्या कार्यांचे ऐतिहासिक सिंहावलोकन करण्यात येणार आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व:-**

बाबा आमटे भारतातील थोर समाज सुधारक होते. त्यांचे कार्य समाजसेवेपुरते समर्यादित नव्हते. त्यांनी भारत जोडो आंदोलन उभारून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. त्याचप्रमाणे नर्मदा बचाव आंदोलनातून पर्यावरण संरक्षणाचा दृष्टिकोन लोकांना दिला. बाबा आमटे म्हणजे कुष्ठरोग्यांचे आशेचे किरण होते. त्यांनी कुष्ठरोग्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करून विधायक कार्याकडे वळविले. बाबा आमटे यांच्या कार्याचे महत्त्व खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी केलेले कार्य जाणून घेता येईल.

२) बाबा आमटे यांची स्वातंत्र्य लढ्यातील भूमिका जाणून घेता येईल.

३) भारत जोडो अभियानासंदर्भात माहिती घेता येईल.

४) नर्मदा बचाव आंदोलनात केलेल्या कामगिरीचा अभ्यास करता येईल.

५) बाबा आमटे यांच्या इतरही कार्यावर प्रकाश टाकता येईल.

**शोध निबंधाची उद्दिष्टे:-**

१) बाबा आमटे यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे

२)बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी केलेले कार्य अभ्यासणे.

३) बाबा आमटे यांचे समाजसेवेसोबतच केलेल्या इतरही कार्याचा आढावा घेणे.

**गृहीतके:-**

१) बाबा आमटे कुष्ठरोग्यांसाठी संजीवक ठरले.

२) बाबा आमटे आपल्या कार्यातून इतिहास घडविला.

३) बाबा आमटे यांच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेतल्या गेली.

४) बाबा आमटे यांनी मानवतावादी दृष्टिकोन ठेवून समाजात नवीन मूल्य रुजविले.

**संशोधन पद्धती:-**

बाबा आमटे यांच्या कार्याचे ऐतिहासिक सिंहावलोकन या शोधनिबंधाकरिता ऐतिहासिक संशोधन पद्धती मधील विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाईल. तसेच प्राथमिक व दुय्यम साधने, वर्तमानपत्रे यांचा सुद्धा आधार घेण्यात येईल.

**बाबा आमटे यांचे प्रारंभिक जीवन:-**

मुरलीधर देविदास आमटे म्हणजे बाबा आमटे हेच होत. बाबा आमटे यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे २६ डिसेंबर १९१४ रोजी झाला. वरोड्याजवळच्या गोरज या खेड्यात त्यांची जमीनदारी होती. वडील सरकारी खात्यात मोठ्या मुद्द्यावर नोकरीला होते लहानपणीच त्यांना बाबा या नावाने हाक मारीत असत. पुढील काळात हेच नाव रूढ झाले. बाबांचे प्राथमिक शिक्षण वरोड्याला झाले.त्यानंतर बाबांनी नागपूर येथे हिस्लाप कॉलेज मधून १९३४ मध्ये बी. ए .चे शिक्षण पुर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना बाबाचा क्रांतिकारक राजगुरू यांच्याशी संबंध आला होता. नंतर त्यांनी १९३६ मध्ये एल. एल. बी. ची पदवी प्राप्त केली. ते वडिलांच्या इच्छेनुसार वकिली व्यवसायात पदार्पण केले. बाबा दुर्ग येथील स्वातंत्र्य सेनानी अॅड. विश्वासराव तामस्कर यांच्यासोबत चार वर्ष काम केले. मग तेथील वकिली सोडून वरोड्याला आले. १९४० मध्ये बाबांनी वरोड्यात वकिली व्यवसायाला सुरुवात केली. महात्मा गांधीच्या सहवासाने सामाजिक कार्याकडे आकर्षित झाले. बाबांनी गोरगरिबांच्या हक्कासाठी वकिली सुरू ठेवली. सोबतच ते सामाजिक कार्यात सहभागी झाले. एक बंडखोर तरुण विधायक कार्याकडे वळतो ही बाब निश्चितच कलाटणी देणारी ठरली. बाबा आमटे यांनी समाजातील प्रत्येक घटकांना जागविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. म्हणूनच बाबा आमटे खऱ्या अर्थाने युगनायक ठरले.

**बाबा आमटे यांची स्वातंत्र्य लढ्यातील भूमिका:-**

बाबा आमटे नागपुरात शिक्षण घेत असताना क्रांतिकारी संघटनेशी जुळल्या गेले. पण त्यांना सशस्त्र क्रांतीने देशाला स्वातंत्र्य मिळू शकत नाही याची जाणीव त्यांना झाली. मग ते महात्मा गांधीजी यांच्या विचारांकडे आकर्षित झाले. १९४२ च्या चले जाव आंदोलनाची हाक दिली. संपूर्ण भारत त्यांच्या पाठीशी उभा राहिला. महात्मा गांधीजीची खादी टोपी डोक्यावर घालून गांधींचे साहित्य विक्रीसाठी खेडोपाडी फिरले. बाबा आमटे या लढ्याच्या वेळी वंदे मातरम् ची घोषणा केली. त्यावेळी २१ दिवसाचा तुरुंगवास चंद्रपूर या ठिकाणी भोगावा लागला. गांधीवादी सत्याग्रही म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. चले जाव आंदोलनाची धग मोठ्या प्रमाणात वाढली. चिमूर मध्ये फार मोठी क्रांती या वेळी झाली. तेव्हा चिमूर येथील

क्रांतिकारकांना पकडुन तुरुंगात रवानगी केली. चिमूर क्रांती मधील क्रांतिकारकांना सोडविण्याची जबाबदारी श्री राजगोपालाचारी व के मुंशी या काँग्रेसच्या नामांकित वकिलांना त्या ठिकाणी नियुक्त करण्यात आले.परंतु ते या चळवळीत गुंतून असल्याने या संपूर्ण खटल्याची जबाबदारी बाबा आमटे यांनी उचलली होती. त्यांनी श्री. बळवंतराव देशमुख यांच्या सोबत न्यायालयात युक्तिवाद केला. बाबा आमटे वरोड्यावरून नागपूरला जात असताना गोऱ्या सैनिकांनी ट्रेनच्या डब्यात नववधूशी गैरवर्तन केले. बाबांना पहावले नाही. त्यांनी हस्तक्षेप केला परंतु गोऱ्या सैनिकांनी बाबावर धाव घेतली. बाबा थोडे वेळ शांत झाले वर्धा स्टेशनवर आत गाडी थांबली तेव्हा बाबांनी तिथे प्लॅटफॉर्मवर गाडी अडवून धरला. लोकांची गर्दी जमली त्या सैनिकांचा कमांडिंग ऑफिसर तिथे आला त्यांनी घटना घडलेल्या घटनेची चौकशी करण्याचे वचन दिल्यावर बाबा शांत झाले. ही घटना महात्मा गांधीच्या कानावर गेली. तेव्हा त्यांनी बाबाचं नामकरण अभय साधक म्हणून केले. बाबा आमटे यांचा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग अल्पसा असला तरी महत्त्वपूर्ण होता.

**बाबा आमटे यांचे सामाजिक कार्यातील योगदान :-**

बाबा आमटे महात्मा गांधी वर्धेला असताना नेहमी भेटायला जात होते. त्यांच्या रचनात्मक कार्याकडे पाहून बाबा सामाजिक सुधारण्याच्या कार्याला सुरुवात केली.वरोडयाला वकिली करत असताना गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी तिचा उपयोग केला.बाबा एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी दलित, मजूर आणि उपेक्षित यांच्या १६ संघटना तयार केल्या.त्यांनी अस्पृशोद्धाराचे कार्य हाती घेतले. बाबा आमटे आणि साधना ताई हरिजन वस्तीमध्ये जात होते. गोरगरीब लोकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून द्यायचे. अस्पृश्यांवर होणाऱ्या अत्याचाराला त्यांनी विरोध करण्यास सुरुवात केली. बाबांनी एक दिवशी हरिजनांना घेऊन हॉटेलमध्ये गेले.हॉटेल मालकाने इच्छा नसताना सर्वांना चहा पाजला. या त्यांच्या कार्यामुळे समाजाकडून कडाडून विरोध होऊ लागला.तसेच त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या सुद्धा येऊ लागल्या. घरावर दगडफेक सुद्धा करण्यात आली होती. हे कार्य करत असताना घरमालकाने त्यांना घरमालकाने त्यांना घर सोडायला सांगितले.त्यावेळी बाबाचे स्नेही मित्र रा. कृ. पाटील यांच्या जुन्या बंगल्यात बाबा कुटुंबासह राहू लागले. बाबांनी संघटना उभ्या केल्या होत्या मात्र या संघटनांचे ते नेते नव्हते. बाबांनी याच बंगल्यात अठरा अगडपगड जातीतील लोकांना सोबत घेऊन श्रमाश्रम चा प्रयोग सुरू केले.त्या श्रमाश्रम च्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवून त्यांच्यात आत्मविश्र्वास निर्माण केले. हा त्यांचा प्रयोग सामाजिकदृष्ट्या महत्वपूर्ण ठरला. हा प्रयोग दीड वर्ष चालल्यानंतर काही अडचणींमुळे बंद पडला. मग पुढे काय करायचं हा प्रश्न त्यांच्यापुढे पडला. पण बाबा स्वस्थ बसले नाहीत.त्यांनी पुढे कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी संपूर्ण जीवन खर्ची घातले.

**बाबा आमटे यांचे कुष्ठरोग निवारणाचे कार्य :-**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बाबा आमटे राजकारणात न जाता सामाजिक कार्यात सहभागी झाले. बाबा वरोरा येथे मैला वाहून नेत असताना तुळशीराम नावाचा कुष्ठरोगी गटारात पडलेला दिसला. बाबांनी त्या रुग्णाला घरी नेऊन उपचार केले.पण तो वाचू शकला नाही.याचे शल्य बाबांना झाले.या घटनेचा परिणाम बाबांवर झाला. बाबांनी कुष्ठरोग्यांच्या निवारणाचे कार्य हाती घेतले. परंतु बाबाकडे कुष्ठरोग्यांवर उपचाराचे ज्ञान नव्हते. म्हणून बाबा मनोहर दिवाण यांच्या वर्धा येथील दत्तपुर कुष्ठरोगी केंद्रात जाऊन प्रशिक्षण घेतले. त्यानंतर बाबांनी वरोरा येथे शासकीय दवाखान्यापुढे आपले कुष्ठरोग तपासणी केंद्र सुरू केले. या माध्यमातून कुष्ठरोग्यांवर कार्य करीत आहेत, ही बाब खेड्यापाड्यात पोहोचली. बाबांच्या तपासणी केंद्राला कुष्ठरोग्यांची गर्दी वाढली. हे सर्व पाहता बाबांनी वरोडयातील मित्रांच्या मदतीने १९४९ ला महारोगी सेवा समितीची स्थापना केली. बाबा कुष्ठरोग्यांवर उपचार करण्याचे अधिकचे ज्ञान मिळविण्यासाठी १९४९ ला कलकत्ता येथे स्कूल ऑफ ट्राफिकल मेडिसिनमध्ये प्रवेश घेतला. तिथे त्यांनी चांगल्या गुणांनी हा अभ्यासक्रम उत्तीर्ण केला. बाबा वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी नसल्याने त्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही. मात्र कुष्ठरोग यावर उपचार कसे करावे याचे याचे उत्तम ज्ञान त्यांनी घेतले. बाबांनी रा. कृ. पाटील यांच्या सहकार्याने महारोगी सेवा समितीला ५० एकर जमीन मिळाली. मिळालेली जमीन खडकाळ जंगलव्याप्त होती. बाबांनी ते जंगल साफ करून त्या ठिकाणी बांबू व तट्ट्याचा वापर करून झोपडी बांधली. मात्र पाण्याचा प्रश्न कायम होता. शेजारचे शेतकरी कुष्ठरोग्यांना पाणी पिण्यास मनाई करीत होते. बाबांनी कुष्ठरोग यांच्या मदतीने विहीर खोदली. २१ जून १९५१ ला विनोबा भावे यांच्या हस्ते आनंदवनाचा उद्घाटन झाला. बाबा आपल्या सहा कुष्ठरोगींना घेऊन झोपडीत प्रवेश केला. विनोबांनी त्या वेळेला बाबांना आशीर्वाद देताना म्हटले,या ठिकाणी सेवेचा रामायण घडेल. तो त्यांचा आशीर्वाद भविष्यात बाबांनी खरा ठरविला. बाबा सुरुवातीपासूनच आनंदवनात कुष्ठरोग्यांवर उपचार करणे, औषध देणे, रक्त तपासणी व जखमांवर मलमपट्टी करणे हे कार्य करीत होते. १९५३ पर्यंत

आनंदवनातील कुष्ठरोग्यांची संख्या साठ वर जाऊन पोहोचली.बाबा आनंदवनात मिळालेल्या जमिनीवर कुष्ठरोग्यांच्या सहकार्याने नंदनवन फुलविले. बाबांनी या काळात रुग्णांना सेवेऐवजी सामर्थ्य आणि दयेएवजी काम दिले.बाबांनी आपल्या कार्यातून टीकाकारांचे तोंड बंद केले आनंदवन ही कुष्ठरोग्यांची वसाहत नाही तर रोगमुक्तांनी चालविलेले केंद्र आहे. याची कल्पना बाहेरच्या लोकांना झाली. १९५३ मध्ये आंतरराष्ट्रीय संघटनेचे ५० स्वयंसेवक आनंदवनात आले.बाबांनी एस. सी. आय. चे ५० स्वयंसेवक, मगनवाडी राष्ट्रसेवा दल आणि सेवाग्रामच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून अनेक बांधकाम केले.परकीय लोक आनंदवनात काम करतात हे पाहून स्थानिक लोकांनी सहकार्य केले. तसेच वरोड्यातील रेल्वे कर्मचाऱ्यांनी आनंदवनात विहीर खोदून दिले. या त्यांच्या प्रयत्नामुळे आनंदवनात कुष्ठरोग्यांची राहण्याची व्यवस्था झाली. हळुहळू आनंदवन प्रगतीपथावर मार्गक्रमण करू लागला.

बाबा आमटे कुष्ठरोग्यांचे कार्य करीत असताना आनंदवनात अनाथ बालकांचे संगोपन केले. ताई आणि बाबाच्या प्रेमामुळे लहान बालकांचे गोकुळ उभे झाले.या बालकांना बाबांनी चांगले शिक्षण देऊन उत्तम नागरिक बनविले.

बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या साहाय्याने आनंदवनातील शेतीत विविध प्रयोग करून पिके घेतली.येथील अन्नधान्य, भाजीपाला आणि दुधाची मागणी वाढली.आनंदवनाच्या आर्थिक विकासाला पाठबळ मिळाले.

बाबा आमटे यांनी चंद्रपूर जिल्ह्यात कुष्ठरोग शोधण्यासाठी ट्रेस अँड स्ट्रीट ही मोहीम चालवली. बाबांना त्यावेळी अनेक कुष्ठरोगी समाजात आढळून आले. या कुष्ठरोग्यांना सेवा देण्यासाठी आसपासच्या गावात १९५७ मध्ये ११ उपचार केंद्रे सुरू केली. बाबा प्रत्येक दोन दिवसात केंद्रावर जाऊन कुष्ठरोग्यांना उपचार देत होते. बाबांनी हे कार्य अव्याहतपणे ३० वर्षे सांभाळले. त्या वेळेला कुष्ठरोग्यांवर उपचार करण्यासाठी डॉक्टर मिळाले नाही. परंतु बाबा खंबीर मनाने कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी सर्वस्व पणाला लावले होते. बाबाचे कार्य पाहून सरकारने कुष्ठरोग निर्मूलनाचा कार्यक्रम हाती घेतला होता.

बाबांच्या या कार्याला अनेक प्रदेशातील व्यक्ती संस्था आणि भारतातील लोकांनी मदत केली. म्हणूनच अनेक प्रकल्प बाबांना यशस्वी करता आले बाबा रोगमुक्त झालेल्या कुष्ठरुगणाचे १९६२ ला मुक्ती सदन प्रकल्प सुरू करून त्यात कुष्ठमुक्त जोडपी व इतर रुग्णांच्या निवासाची व्यवस्था केली. त्याही पुढे जाऊन त्यांनी आनंदवनात कुष्ठमुक्त वधू वर यांचे विवाह करून दिले. तसेच वयोवृद्ध पुष्ट मुक्तांनाही आधाराची गरज होती. त्यावेळी सुख सदन आणि स्नेह सावली प्रकल्प उभारले. तसेच विविध उद्योगावर काम करणाऱ्या लोकांसाठी आनंदवनात उद्योग भवन बांधले. बाबांनी आनंदवनात नाविन्यपूर्ण टिन कॅन प्रकल्प संधी निकेतन प्रकल्प कुष्ठमुक्तांसाठी सुरू केले. संधी निकेतनमधून कुष्ठमुक्ताबरोबरच अंध अपंग मूकबधिर या सर्वांना व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली. येथील परिवाराला आपण समाजापासून दुरावलो आहोत याची उणीव भासू नये अशांना सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होता यावे म्हणून मुक्तांगणची निर्मिती केली. या वास्तुत गायन वादन चित्रपट व्याख्याने आदी कार्यक्रम घेतले जात.

बाबांनी केवळ कुष्ठकार्य करायचे असे बंधन घातले नव्हते. समाजातील कोणत्याही दिनदुबळया व्यक्तींसाठी काम करायचे हे तत्व त्यांनी जोपासले.यामुळे कुष्ठरुगणासोबतच अनाथ बालकांचे पालकत्व स्वीकारून या सर्वांच्या वेदनेवर मात करून आनंदी जीवन जगण्याची कला शिकविली.१९८२ ला पंतप्रधान इंदिरा गांधींनी आनंदवनाला भेट दिली. बाबांचे कार्य पाहून त्या भारावल्या. १९९० ला आनंदवन हलविण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले परंतु बाबा ने शासनाला कुष्ठमुक्त रोगांचे पुनर्वसन करून आनंदवन इतरत्र हलवावे अशी मागणी केली. बाबाच्या लढ्यामुळे आनंदवन तिथेच राहिला. बाबाच्या शब्दकोशामध्ये विश्रांती हा शब्द नव्हता. ते अविश्रांतपणे आपले कार्य करीत राहिले.

बाबा आमटे यांनी आनंदवन सोबतच अशोकवन, सोमनाथ, नागेपल्ली व हेमलकसा या ठिकाणी प्रकल्प सुरू केले. त्या प्रकल्पाच्या माध्यमातून त्या त्या भागातील लोकांची सेवा केली जात होती. मुल तालुक्यातील सोमनाथ या ठिकाणी महारोगी सेवा समितीचे अनेक प्रकल्प सुरू केले. या शाखेत श्रमसंस्कार शिबिर आयोजित करून तरुणाईला विधायक कार्याकडे वळविले. तसेच त्या ठिकाणी शेती मध्ये आधुनिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरून शेती विकसित केली आहे. येथे सुद्धा अनेक कुष्ठरोगी राहतात.

बाबा आमटे यांच्या मनात आदिवासी विकासाचे अनेक स्वप्न होते. त्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांच्या मनात अनेक योजना होत्या. बाबांनी हेमलकसा लोक बिरादरी प्रकल्प सुरू करून त्याला मूर्त स्वरूप दिले. बाबांनी त्या भागाला भेट दिली. हा भाग विकासापासून कोसो दूर होता. मग बाबा आमटे यांनी अनेक अडचणींचा सामना करून आरोग्य शिक्षण आणि शेती या त्रिसूत्रीवर आधारीत हा प्रकल्प २३ डिसेंबर १९७३ रोजी सुरू केला. या प्रकल्पामुळे आरोग्याच्या अनेक समस्या दूर करण्याचे काम डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदा आमटे यांच्या माध्यमातून झाले. आदिवासी समाज मुळातच शिक्षणापासून कोसो दूर होता ही गरज ओळखून १९७६ ला प्रकल्पात एक आश्रम शाळा सुरू केली. बाबाच्या कामाने प्रेरित झालेला गोपाळ फडणवीस या तरुणाने शाळेची जबाबदारी स्वीकारली. तर रेणुकाताईंनी रुग्णसेवेबरोबर शिकवण्याचे काम हाती घेतले. अशा अशाप्रकारे माडिया लोकांना अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे काम बाबा आमटे यांच्या माध्यमातून झाले. आज त्या ठिकाणी सुसज्ज हॉस्पिटल आहे. अनेक मोफत शस्त्रक्रिया

आयोजित करून हजारो गरीब रुग्णांना याचा लाभ मिळत आहे. त्याचप्रमाणे आधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान विकसित करून शेती केली जात आहे. या प्रकल्पामुळे आज आदिवासी बांधव प्रगती साधताना दिसतोय आहे. आज या प्रकल्पाची जागतिक स्तरावर दखल घेतल्या गेली आहे.

आनंदवनाची जबाबदारी सध्याच्या घडीला डॉ. विकास व डॉ. भारती आमटे सांभाळत आहेत.

**भारत जोडो अभियान:-**

बाबा आमटे कुष्ठरोगी निवारणाच्या कार्यात गुंतलेले असताना 1985 ला भारत जोडो आंदोलन उभारले. इंदिरा गांधीजी यांच्या हत्येनंतर पूर्ण भारतभर अस्थिरता निर्माण झाली होती. यामुळे बाबांनी भारत जोडो अभियानाला मूर्त रूप देण्याचे ठरविले. देशात राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक विषमता नष्ट करणे आणि तरुणाईला राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात गुंतवणे हा हेतू या अभियानामागे होता. २४ डिसेंबर १९८५ ला कन्याकुमारी वरून १०७ दिवस,१४ राज्यांचा, ५०४२ किलोमीटर अंतरांचा रोज ५० ते ६० किलोमीटरचा प्रवास करून १० एप्रिल १९८६ ला ही यात्रा समाप्त झाली. बाबांना प्रकृती अस्वस्थामुळे बसता येत नव्हते, तरी सुद्धा ते ॲम्बुलन्स मध्ये झोपून त्यांनी यात्रा केली. त्यांच्यासोबत १२५ तरुण निरनिराळया राज्यातील, निरनिराळया धर्माचे, निरनिराळी भाषा बोलणारे होते त्यात १४ मुलींनी सहभाग घेतलेला होता. बाबा आमटे यांनी या अभियानादरम्यान राष्ट्रीय एकता, सामाजिक विषमता, जाती निर्मूलन, स्त्री मुक्ती व समानता, मुलांसाठी, स्त्रियांसाठी पटनाट्य, प्रदर्शनी या माध्यमातून प्रबोधन केले. तसेच बाबांनी विविध राज्यात वृक्षारोपण केले. या यात्रेदरम्यान बाबांना जीवे मारण्याच्या धमक्या आल्या. परंतु बाबांनी या धमक्यांना भीक न घालता आपला निर्धार पूर्ण केला. पंजाब अशांत होता. अनेक फुटीरतावादी गट कार्यरत होते. पंजाब पेटलेला होता. त्यावेळी बाबांनी सर्व स्तरांतील बऱ्याच लोकांशी बोलून शांततेचे आवाहन केले.नंतर बाबांनी दुसरी भेट शांतता यात्रेतून १ जुलै १९८६ ते ९ ऑगस्ट १९८६ या काळात पंजाबला दुसरी भेट दिली. ४१ दिवसात ५० गावांना भेटी देऊन लोकांना धीर देण्याचे कार्य केले. तसेच देशाच्या पंतप्रधानाला या परिस्थितीकडे लक्ष घालण्याची मागणी केली. नंतर बाबांनी पूर्व पश्चिम भारतातील राज्यात भारत जोडो यात्रा १ नोव्हेंबर १९८७ ते २६ मार्च १९८८ ला काढली. त्यातून त्यांनी सिक्किम पश्चिम बंगाल ओरिसा बिहार उत्तर प्रदेश मध्य प्रदेश गुजरात या राज्यात प्रवास केले त्यात ७५ यात्री सहभागी झाले. या यात्रेत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. एकूणच भारत जोडो यात्रा आहे बाबांची अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण होती.

**नर्मदा बचाव आंदोलन:-**

सरकारने सरदार सरोवर नर्मदा नदी व इतर राज्यात धरणे बांधण्याची योजना अमलात आणण्याचे जाहीर केले परंतु या धोरणामुळे अनेक आदिवासी लोकांना व सर्वसामान्य लोकांना विस्थापित व्हावं लागत होते तसेच विकासाच्या नावावर पर्यावरणाचा फार मोठा रास होईल या गोष्टींचा विरोध होऊ लागला त्या विरोधात भारतात अनेक समाज कार्यकर्त्यांनी आंदोलन उभे केले त्यावेळी बाबा आमटे यांनी 1988 मध्ये आनंदवनात सहभाग घेतली.त्या विरोधात एक जाहीरनामा वाचून दाखवला. या त्यांच्या सभेत देशातील पर्यावरणवादी उपस्थित होते. मोठ्या धरणाला आमचा विरोध नाही. पण सामान्य लोकांचे जीव उद्ध्वस्त होणार याची धास्ती वाटली. म्हणून मेधा पाटकर यांच्या नेतृत्वात नर्मदा बचाव आंदोलन सुरू झाले. बाबांनी नर्मदा योजनेचा अभ्यास केला. आंध्र प्रदेशातील भोपालपटनम व इचमपल्ली धोरणाला विरोध केले. तरीसुद्धा शासन मानायला तयार नव्हते. बाबांनी दहा ते पंधरा हजार लोकांचा या धरण विरोधात मेळावा घेतला. बाबा आमटे आनंदवन सोडून १९९० ला मध्य प्रदेशातील नर्मदातीरी कसरावद या गावी मुक्काम ठोकला. बाबा सोबत साधनाताई होत्या.बाबांनी या आंदोलनात दिशा देऊन शासन दरबारी प्रश्न नेला. या आंदोलनाची तीव्रता वाढविण्यासाठी मोठा हातभार लावला. बाबांच्या सहभागामुळे या आंदोलनात नवचैतन्य निर्माण झाले.तब्बल दहा वर्षाच्या काळात बाबांनी आंदोलनातील कार्यकर्त्यांना प्रेरणा आणि नैतिक बळ देण्याचे काम केले.

**बाबा आमटे यांचे शैक्षणिक कार्य:-**

सामाजिक विकास साधण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन आनंदवनात बाबांनी कुष्ठमुक्तांच्या सहकार्याने १९६४ ला आनंदनिकेतन महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाला स्विझर्लंड मधील सरकारने दोन लाखाची देणगी दिली. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना कला वाणिज्य व विज्ञान शाखेत शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. बाबा इथेच थांबले नाही तर १९६५ ला आनंदनिकेतन कृषी

महाविद्यालय,१९६६ ला आनंद आनंद विद्यालय तसेच १९८३ ला आनंद मूकबधिर विद्यालय सुरू केले. सोमनाथ प्रकल्पामध्ये श्रमिक विद्यापीठ स्थापन करून बाबा आपले स्वप्न पूर्ण करणार होते. यासाठी त्यांना दोन हजार एकर जमिनीची आवश्यकता होती. पण शासनाने बाराशे एकर जमीन दिली.अनेक अडचणीमुळे बाबांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. बाबांनी लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसा येथे वैद्यकीय उपचाराबरोबर तेथे मागासलेल्या माडिया लोकांच्या विकासासाठी १९७६ ला आश्रम शाळा सुरू केली. या आश्रम शाळेतून माडीया विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेतले. आज शासकीय नोकरीत डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, पोलीस आणि वनरक्षक म्हणून नोकरीला आहेत.यामुळे माडिया समाजातील विद्यार्थ्यांना प्रगतीचे पाऊल गाठता आले. अशा प्रकारे आदिवासींच्या जीवनातील या मूलभूत समस्या होत्या. त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. बाबांच्या शैक्षणिक कार्यामुळे चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात मागासलेल्या भागाला प्रवाहात आणण्याचे अतुलनीय कार्य केले.

**निष्कर्ष :-**

बाबा आमटे यांच्या कार्याचे ऐतिहासिक सिंहावलोकन करताना लक्षात येते की, बाबा आमटे हे फक्त व्यक्ती नाहीत तर ते महानायक होते. त्यांनी श्रीमंतीचा त्याग करून सामाजिक न्यायाचे वकील होऊन समाजातील वंचितांना न्याय मिळवून दिले. कुष्ठरोग्यांच्या निवारणार्थ संपूर्ण आयुष्य खर्ची घालून त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करून स्वावलंबी केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन महत्वपूर्ण योगदान दिले. भारत जोडो अभियानाच्या माध्यमातून देशातील परिस्थिती पूर्वपदावर आणण्यास बाबाचा अनमोल वाटा होता.बाबांनी पंजाब शांतता यात्रा काढून तेथील शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य केले. बाबा आमटे यांनी विकासाच्या नावाखाली नर्मदा नदीवर अनेक धरणे बांधल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून नर्मदा बचाव आंदोलनात सहभाग घेऊन विरोध केला. बाबाच्या कार्याने अंध, अपंग, मूकबधिर आणि माडीया आदिवासी आणि दलित बांधवांना प्रवाहात आणण्याचे कार्य केले. बाबांनी आपल्या प्रकल्पात दवाखाने व आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याने गरीब लोकांना फायदा झाला. बाबांचे कार्य समाजातील प्रत्येकांना प्रेरणादायी आहेत.

**अरुण बी. आलेवार**

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

१) आमटे साधना, समिधा, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, सप्टेंबर २०२४, सहावी आवृत्ती.

२) शेवडे डॉ. इंदुमती, बाबा नावाचा झंझावात, आरती प्रकाशन डोंबिवली, १९९१, प्र. आ.

३) धर्माधिकारी तारा , बाबा आमटे, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नई दिल्ली, १९९९, प्रथम आवृत्ती.

४) मीरचंदानी निशा ,अनुवाद लिना सोहनी,अमरगीत बाबा आमटे यांचे जीवन, चरित्र मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, सप्टेंबर २०२०, प्र. आ.

५) बापट भ. ग. ,बाबा आमटे, राजहंस प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड पुणे,मे २०२३ ,१४ वी आवृत्ती.

६)आमटे डॉ. प्रकाश, प्रकाश वाटा, समकालीन प्रकाशन पुणे, जाने. २०२२ ,४० वी आवृत्ती.

७) काटकर घोगरे सुचित्रा, समाजभूषण बाबा आमटे, श्री गंधर्व वेद प्रकाशन पुणे,२०१२, प्र. आ.

८) गुजराती अशोक, बाबा आमटे खुशबू का अहसास,नॅशनल बुक ट्रस्ट नई दिल्ली,प्रथम संस्करण २०११.